**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०९/२०१६-१७/८३ दिनांक:१३-०७-२०१६

## आदेश
## आदेश केस क्र. ०९/२०१६-२०१७

| | |
|---|---|
| श्रीमती फुलाबाई अप्पाजी गडदे,<br>मु. पो. डफळापूर<br>ता. जत, जिल्हा सांगली. | **अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ<br><br>३) उपकार्यकारी अभियंता / अति. कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, जत | **पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री विलास श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्रीमती फुलाबाई आप्पाजी गडदे, रा. डफळापूर ता. जत. जि. सांगली यांनी फेब्रुवारी २०१४ मध्ये आपल्या शेत जमिनीत नवीन घर बांधले आणि सदरच्या घरात विद्युत पुरवठा मिळणेसाठी विज वितरण कंपनीकडे दिनांक १६-०४-२०१४ रोजी अर्ज देऊन रु. १५००/- अनामत रक्कम भरली. तथापि नियमाप्रमाणे त्यांचे घरात विद्युत पुरवठा अद्याप दिलेला नाही. त्यामुळे त्यांनी मार्च-एप्रिल-२०१६ मध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे आपले गा-हाणे दाखले केले. सदर कक्षाने दिनांक ०५-०५-२०१६ च्या आदेशाने जेष्ठता यादीनुसार विद्युत पुरवठा देण्यात येईल असे कळविले. त्यामुळे तक्रारदारातर्फे श्री अरविंद आप्पाजी गडदे रा. मुंबई यांनी दिनांक ०३-०६-२०१६ रोजी प्रस्तुत प्रकरण या मंचाकडे, सदर घरात त्वरीत विद्युत पुरवठा मिळणेबद्दल व दर आठवडयास रु. १००/- भरपाई मिळणेबद्दल वगैरेबाबत दाखल केले आहे.

२) दिनांक ०९-०६-२०१६ रोजी वि.प. यांना उपरोक्त तक्रारीस त्यांचा खुलासा सादर करणेस कळविणेत आले, तथापि मुदतीत त्यांनी असा खुलासा दाखल केला नाही व त्यांची प्रत तक्रारदारास पाठवली नाही. तथापि दिनांक ०७-०७-२०१६ रोजी सुनावणीचे वेळी जत उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता यांनी पत्ररुपात म्हणणे दाखल केले . वि.प. यांचे कथन असे आहे की, तक्रारदार यांचे नाव जेष्ठता यादीमध्ये अ.क्र. ५०५ येथे नोंद आहे, त्यांना वीज कनेक्शन देण्यासाठी एक पोलची विद्युत वाहिनी आवश्यक आहे. तक्रारदार यांना महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे घरगुती वीज कनेक्शन देणेत येईल.

३) सदर प्रकरणची सुनावणी दि. ०७-०७-२०१६ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार अगर त्यांचे प्रतिनिधी श्री अरविंद गडदे उपस्थित नव्हते. परंतु श्री अरविंद गडदे यांच्याशी भ्रमणध्वनी वरुन संपक झाला. त्यावेळी त्यांनी आपले म्हण्णे कथन केले.

सुनावणीचे वेळी कार्यकारी अभियंता श्री सायस सोपान दराडे आणि उपकार्यकारी अभियंता श्री सुरेश आमसिंध मैलापूरे उपस्थित होते.

तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री अरविंद गडदे (मोबाईल क्रमांक ९८६९६०२२६०) यांनी भ्रमणध्वनीवर सांगितले की, तक्रारदारांचे नवीन घरात लौकरात लौकर विद्युत पुरवठा देणेत आले तर ते भरपाईची मागणी सोडून देत आहेत. वि.प. तर्फे असे निवेदन देणेत आले की, विद्युत पुरवठा देणेसाठी २००फूट अंतरात एका खांबाची आवश्यकता आहे व त्यांची पूर्तता करुन लौकर कनेक्शन देणेचा प्रयत्न करणेत येईल.

४) वरील सर्व विवेचना वरुन खालील प्रमाणे मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

(अ) तक्रारदार हे त्यांच्या नवीन घरामध्ये विद्युत पुरवठा त्वरीत मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तरः- होय

(ब) कोणता आदेश?

उत्तरः- खालील प्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

५) उपलब्ध कागदपत्रांचे बारकाईने वाचन केले असता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी फेब्रुवारी २०१४ मध्ये आपल्या शेत जमिनीत नवीन घर बांधले. सदर नवीन घरात विद्युत पुरवठा मिळणेसाठी त्यांनी वितरण कंपनीकडे दिनांक १६-०४-२०१४ रोजी अर्ज करुन अनामत रक्कम रु. १५००/- (रु. पंधराशे फक्त) जमा केली. अशाच प्रकारची इतर अनेक विद्युत पुरवठा देण्याचे कामी जी जेष्ठता यादी करणेत आली त्यामध्ये अ.क्र.५०५ येथे तक्रारदार यांचे नाव नोंद करण्यात आले.

६) वि.प. - वितरण कंपनी यांनी तक्रारदारांच्या नवीन बांधलेल्या घरात नियमानुसार तीस दिवसात विद्युत पुरवठा केला नाही ही बाब स्पष्ट आहे. वि.प. प्रतिनिधी श्री सुरेश मैलापूरे यांनी सांगितले की, २०० फूट अंतरात एक वीज खांब उभारणेची आवश्यकता आहे. त्यांनी प्रयत्न करुन तीन महिण्यात तक्रारदराचे घरात विद्युत पुरवठा देण्याची मंचासमोर तयारी दर्शविली आहे. तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री अरविंद गडदे यांचेशी सुनावणीचेवेळी भ्रमणध्वनी वरुन झालेल्या चर्चेमध्ये त्यांनी , जर वितरण कंपनी लोक्रात लौकर विद्युत पुरवठा देत असेल तर आपण नुकसान भरपाईची केलेली मागणी सोडून देऊ असे सांगितल आहे.

७) तक्रारदार यांनी काही विशिष्ट प्रसंगी , जमिनी वरुन वायर टाकून विनामिटर मोफत विद्युत पुरवठा त्यांच्या घरात पुरवणेची केलेली मागणी स्विकारार्ह नाही. तसेच तक्रार अर्जाच्या शेवटी कलम ३ मध्ये केलेल्या विनंतीचा विचार करता येणार नाही.

८) उपरोक्त परिस्थितीत आणि तक्रारदारांच्या प्रतिनिधीशी समक्ष भ्रमणध्वनीवरुन झालेल्या संभाषणनुसार प्रस्तुत गा-हाणे अंशतः मंजूर करुन खालील प्रमाणे आदेश करणे उचित होईल असे मंचास वाटते.

**आदेश**

(अ) वि.प. वितरण कंपनीने उपरोक्त तक्रारदार यांच्या शेत जमिनीतील नवीन घरासाठी या निर्णयाचे दिनांकापासून दोन महिण्यात विद्युत पुरवठा देऊन त्यांचा विद्युत पुरवठा सुरु करावा. अन्यथा सदर मुदतीनंतर प्रत्येक आठवडयास अगर त्यांच्या भागास शंभर रुपये भरपाई, विद्युत पुरवठा देणेत येईल तो पर्यन्त, मिळणेस तक्रारदार पात्र राहातील.

१. ग्राहकाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.
२. नियमानुसार ग्राहकास विलंब भरपाईबाबत अवगत करावे
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(विलास श. गुळवणी)
अध्यक्ष

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.